# भारतातील मेंढपाळ आणि शेतकरी यांच्यातील पिढीजात परंपरांचे पाईक होताना

**Rituja Mitra and Sahith Goverdhanam**

**भारतात मेंढीपालन आणि शेती यांमधील परस्परसंबंध हे परंपरेने चालत आलेले आहेत. या संबंधांची उदाहरणे आजही आपल्याला देशभर जागोजागी दिसून येतील. आपल्या पारंपारिक व्यवस्थेचा भाग असलेले हे संबंध आजच्या काळात पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत आणि वैश्विक अर्थव्यवस्था निर्माण करण्याच्या कामात अगदी महत्त्वाची भूमिका बजावण्यास सक्षम आहेत. उपलब्ध नैसर्गिक संसाधनांचे उत्तम व्यवस्थापन, स्थानिक वातावरणाशी जुळवून घेण्याची कला, मेंढ्याच्या माध्यमातून मिळणाऱ्या पशुधन खतापासून मातीची सुपीकता वाढविणे, आणि यातून आर्थिक तसेच पर्यावरणीय मूल्यवर्धन करणे या गोष्टी आपल्या पिढीजात चालत आलेल्या या ज्ञानातून आजही शिकता येऊ शकतात.**

शेतकरी आणि पशुपालक यांच्या दरम्यानचे परस्परावलंबित्व हे भारतात अनादी काळापासून चालत आलेले आहे. या संबंधांच्या माध्यमातून पर्यावरणाचा समतोल तर साधला गेलाच शिवाय पशुधनाचा आणि शेतीचा विकास होऊन एक परस्पर हितकारी अशी आर्थिक व्यवस्था उदयास आली. देशभरातील पशुपालक, (मग ते भटके असोत किंवा स्थायीक झालेले असोत) शेतकऱ्यांशी असलेले त्यांचे संबंध कायम ठेवूनच शेती तसेच पशुपालन या दोन्ही व्यवसायांनी आपापला उत्कर्ष साधला आहे. शेतकरी आणि पशुपालक यांच्या दरम्यानचे परस्पर संबंध केवळ शेती आणि पशुपालनच नव्हे तर स्थानिक अर्थव्यवस्था, उपजीविकेची साधने आणि स्थानिक पर्यावरण या सर्वांसाठीच लाभदायक ठरले आहेत.

### परस्पर–संबंधांचा उदय आणि विकास

भारतात पशूंसाठी नैसर्गिक चाऱ्याचे सीमित स्रोत उपलब्ध आहेत. त्यातही तापमान आणि स्थानिक वातावरण, पर्जन्य यांच्यावरच हे स्रोत अवलंबून असतात. चाऱ्याच्या शोधात जनावरे घेऊन सातत्याने फिरावे लागत असल्यामुळे भारतातील पशुपालकांना भटकी जीवनशैली स्वीकारावी लागली. या भटक्या जीवनशैलीमुळे पशुपालक, विशेषकरून मेंढपाळ आणि स्थानिक शेतकरी यांच्यात परस्पर अवलंबित्वाचे नाते निर्माण झाल्याचे भारतातील अनेक राज्यांमध्ये बघायला मिळते. मात्र, हल्लीच्या काळात शेती आणि पशुपालन या दोन्हीचे आधुनिकीकरण झाल्यामुळे ही परंपरा आता लोप पावतेय की काय, असे वाटू लागले आहे.

### एकमेकांना जोडणारा दुवा : पश्चिम भारतातील काही रंजक प्रसंग

गुजरातच्या सौराष्ट्र भागात असणाऱ्या स्थानिक पशुपालकांना मालधारी, भारवाड, किंवा रबारी या नावाने ओळखले जाते. भारवाड आणि रबारी आपली जनावरे घेऊन चाऱ्याच्या शोधात राज्याच्या विविध भागात भटकंती करतात. यादरम्यान जनावरांना मिळणाऱ्या चाऱ्यासाठी ते बरेचदा स्थानिक शेतकऱ्यांच्या शेतीवरच अवलंबून असतात.

स्थानिक शेळ्या आणि हलारी गाढवांचे ब्रीडर असलेले ३७ वर्षीय राजाभाई हे देवभूमी द्वारका भागातील खंबालिया ब्लॉकमध्ये असलेल्या त्यांच्या छोट्याशा खेड्यातून दरवर्षी दिवाळीनंतर थेट राजकोट जिल्ह्यातील उपलेटा ब्लॉकपर्यंत प्रवास करतात. ते म्हणतात, *''खरीप हंगामाच्या शेवटी पिकांची, विशेषतः कापसाची कापणी झाल्यानंतर शेतकऱ्यांना त्यांचे शेत स्वच्छ करण्यासाठी मजुरांची आवश्यकता असते. दुसऱ्या बाजूला आमच्या जनावरांना चाऱ्याची आवश्यकता असते. अशा वेळी आम्ही शेतकऱ्यांबरोबर करार करतो की आम्ही त्यांचे शेत स्वच्छ करून देऊ आणि पुढच्या हंगामासाठी स्वच्छ तयार झालेले शेत त्यांच्या स्वाधीन करू.''*

द्वारिका भागातच राजपरा या खेड्यात राहणारे भूपतभाई बुंदिया हे दरवर्षी ऑक्टोबर ते जून दरम्यान जवळपास दोनशे किलोमीटरचा प्रवास करतात. या प्रवासा मागचे अर्थकारण समजून सांगताना ते म्हणतात, ''कापूस काढणीनंतर शेत स्वच्छ करून देण्यासाठी कुठलाही मजूर दिवसाला तीनशे पन्नास रुपये इतकी मजुरी घेतो आणि रोज जवळपास पाच तास काम करतो. जर पाच एकर शेती असेल तर कुठल्याही शेतकऱ्याला मजूर लावून स्वच्छता केल्यास त्याची दहा दिवसाची मजुरी द्यावी लागते. म्हणजे कमीत कमी साडेतीन हजार रुपये इतका खर्च येतो. याउलट आमच्या मेंढ्या आणि शेळ्या शेतात दिवसभर चराई करतात. त्यानंतर आमच्या कुटुंबातल्या महिला वाळलेली कापसाची झाडे एकत्र करून त्यांच्या मोळ्या बनवून बाजूला बांधून ठेवतात आणि शेत स्वच्छ होते. या कामाचे आम्ही कुठलेच पैसेदेखील घेत नाही.''

एव्हाना शेतकरी आणि पशुपालकांनी हे जाणले आहे की या परस्परसंबंधाचे टिकून राहणे हे केवळ त्यांच्या आर्थिक आणि व्यावसायिक हितासाठीच नव्हे तर पर्यावरण आणि सांस्कृतिक संबंध



छायाचित्र: ऋतुजा मित्रा

जनावरे कापसाच्या शेतात चरत असताना शेताची स्वच्छता करण्यात मग्न असलेल्या भारवाड महिला.

जपण्यासाठी देखील खूप महत्त्वाचे आहे. जामनगरच्या सेठ वडाळा या खेड्याच्या जवळ राहणारे भीमा भाई हे शेतकरी सांगतात, ''मी दरवर्षी पाच मालधारी परिवारांना माझ्या शेतात राहण्यास परवानगी देतो आणि आमच्या परिवारात ही परंपरा अनेक वर्षापासून सुरू आहे.'' जमिनीचा उपयोग सर्वांनाच करता आला पाहिजे, हे पटवून देण्यासाठी ते एका जुन्या गुजराती म्हणींचा संदर्भ देतात. 'सब भूमी गोपाल की' म्हणजेच सगळी जमीन ही भगवान श्रीकृष्णाची आहे म्हणूनच प्रत्येकालाच तिचा वापर करण्याचा समान अधिकार आहे असा या म्हणीचा अर्थ आहे. भिमाभाई सांगतात की शेळ्या आणि मेंढ्या या फक्त त्यांच्या शेतात केवळ चरतच नाहीत तर त्यांच्या लेंड्यांच्या माध्यमातून उत्तम प्रतीचे खतसुद्धा शेतास प्राप्त होते आणि पुढच्या हंगामाच्या आधी जमीन अधिक कसदार होते. पुढे ते सांगतात की मालधारी लोक शेतकऱ्यांना गरज लागल्यास शेळीचे दूधसुद्धा मोफत देतात.

### आंध्र प्रदेशातील परस्पर विश्वासाची गोष्ट

आंध्र प्रदेशच्या अनंतपूर जिल्ह्यातील रापताडू मंडल येथे राहणारे शेतकरीसुद्धा पशुपालक आणि शेतकरी यांचे परस्पराशी असलेले नाते आणि एकमेकांप्रती विश्वासाची उदाहरणे सांगतात. प्रदेशातील अधिकाधिक मेंढपाळ हे कुरुमा समाजाचे आहेत आणि आपल्या मेंढ्यांसाठी चाऱ्याच्या शोधात ते शेतकऱ्यांकडे येतात. शेतकरी त्यांना अन्न, वस्त्र आणि राहण्याची जागा देतात. कुरुमा लोकांचे शेतात रहायला येणे हे येथील शेतकरी एखाद्या सणाप्रमाणे साजरे करतात. त्यांच्याकरिता ते कोरलू पायसम हा विशेष पदार्थ तयार करून त्यांचा पाहुणचार करतात. अनंतपुरसारख्या ठिकाणी पाउस, ऊन आणि थंडीही खूप मोठ्या प्रमाणावर पडते. वर्षानुवर्षापासून चालत आलेले हे नाते मेंढपाळ लोकांची अशा वातावरणात वर्षभर सुरक्षित राहण्याची सोय करते. शिवाय छोट्या शेतकऱ्यांचा देखील त्यांच्या जनावरांमुळे लाभच होतो.

### हिमालयाची कुळकथा

मग जौनसार बावर या भागातील मेंढपाळ आपल्या जनावरांसाठी कुरणांच्या शोधात उत्तरेकडून दक्षिणेकडे आणि मग परतीचा असा प्रवास दरवर्षी करत असतात. या प्रवासात केवळ स्थानिक शेतकरीच नव्हे तर या भागातील कलावंत मंडळींशी देखील त्यांचे वैशिष्ट्यपूर्ण असे नाते तयार झालेले आहे. पश्चिम हिमालयीन भागातील उत्तराखंड राज्याच्या जौनसार बावर भागातील पशू पालकांना 'खास' नावाने ओळखले जाते. शेळ्या आणि मेंढ्याचे पालन करणे हा त्यांचा मुख्य व्यवसाय आहे. सप्टेंबर-ऑक्टोबरच्या कापणीच्या हंगामात जनावरांच्या चाऱ्यासाठी ते मुख्यत्त्वे करून सफरचंद आणि जर्दाळूच्या बागांवर अवलंबून असतात. या पशुपालकांना स्थानिक शेतकरी आपल्या शेतावर येण्याची आणि जनावरांना तेथे चरू देण्याची परवानगी नेहमीच देतात. याच दरम्यान हिवाळ्याची तयारी म्हणून खास लोक आपल्या मेंढ्यांची कातरणी करून

**शेतकरी आणि पशुपालक यांच्यामध्ये असलेल्या या वैशिष्ट्यपूर्ण नात्याच्या पुनरुज्जीवनाची कधी नव्हे इतकी गरज आज निर्माण झाली आहे.**



छायाचित्र : श्रद्धा ठाकरे

जामनगरच्या उपलेटा तालुक्यातील एका कपाशीच्या शेतात आपल्या मेंढ्यांना चरायला देत असलेला एक भारवाड पशुपालक.

लोकर काढतात. काही लोकर ते स्वतःकडे ठेवतात तर काही लोकर 'कोलता' समाजाच्या लोकांना देतात. कोलता लोक हे पिढीजात कारागीर असतात. लोकरीपासून ते स्वतःच्या वापरासाठी सुंदर वस्त्रे विणतात तसेच काही वस्त्रे आपल्या उपजीविकेसाठी बाजारात नेऊन विकतात.

जौनसार भागातील गोर्थी या स्थानिक खेड्याचे रहिवासी असलेले पूरण सिंग चौहान सांगतात, ''अजूनही या भागातील प्रत्येक कुटुंबातील किमान एक किंवा दोन सदस्य हे पूर्णवेळ पशुपालक आहेत. मात्र आता काळ बदलला आहे. अर्थकारण हे मुख्यतः पैशाभोवती फिरायला लागले आहे. त्यामुळे नवीन पिढी ही देहरादून विकासनगर भागात स्थलांतरित झाली आहे. तरुणांचे शहरांत स्थलांतर झाल्यामुळे आता पशुपालानाचा हा व्यवसाय कधी नव्हे इतका रसातळाला गेला आहे.''

चौहान सांगतात की पशुपालनाच्या व्यवसाय कमी झाल्यामुळे केवळ



छायाचित्र : श्रद्धा ठाकरे

अनंतपूर येथे स्थानिक शेतकऱ्याच्या शेतावर जाण्यासाठी मार्गक्रमण करीत असलेला मेंढ्यांचा कळप



अनंतपूर येथे स्थानिक शेतकऱ्याच्या शेतावर जाण्यासाठी मार्गक्रमण करीत असलेला मेंढ्यांचा कळप

शेतकरीच नव्हे तर कारागीर असलेल्या कोलता समाजाचीसुद्धा अपरिमित हानी झाली आहे. पारंपारिक लोकरी वस्त्रे जसे की चौरा (मेंढीच्या लोकरीपासून बनलेला ओव्हर कोट), खुसरा (शेळीच्या लोकरीपासून बनलेली पादत्राणे) आणि खसरा (शेळीच्या लोकरीपासून बनलेली सतरंजी) आता कुणीही वापरत नाही. अशा बदलांमुळे शेतीशी एकरूप झालेले पारंपारिक लोकजीवन आता लयास जाते आहे. अर्थात यामुळे यांच्या परस्पर सह संबंधातून निर्माण झालेली एक परस्पर हितकर अशी व्यवस्थाही आता संपते आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात मेंढ्या आणि शेळ्यांच्या माध्यमातून नैसर्गिक खत उपलब्ध होत नाही. त्यामुळे त्यांना शेती आणि फळबागांमध्ये रासायनिक खतांचा वापर करावा लागतो आहे. याच्या परिणाम स्वरूप नाजूक अशा हिमालयीन भागातील प्राकृतिक व्यवस्थेला दीर्घकालीन धोका पोचतो आहे.

**गरज पारंपारिक नात्याच्या पुनरुज्जीवनाची**

गेल्या काही वर्षांमध्ये पुन्हा एका नैसर्गिक शेतीकडे काही राज्यांचा कल वाढू लागला आहे. अशा परिस्थितीत पशुपालक आणि शेतकरी यांचे एकमेकांशी जुळणे हे दोघांसाठी देखील केवळ आर्थिकदृष्ट्याच नव्हे तर पर्यावरणरक्षणाच्या दृष्टीनेसुद्धा लाभदायक आहे. असे झाल्यास शेतकऱ्यांना थेट त्यांच्या शेतावरच नैसर्गिक खताची प्राप्ती होईल. पशुपालकांनासुद्धा या खताचा मोबदला मिळेल आणि त्यांचेही उत्पन्न वाढेल. अनादी काळापासून चालत आलेले शेती आणि पशुपालक यांचे हे नाते केवळ आर्थिकच नव्हे तर पारंपारिक जीवनपद्धतीशी निगडित ज्ञानाचे भांडार आहे. आहे त्या संसाधनांचा पुरेपूर वापर, शेतीच्या माध्यमातून पशुपालकांचा उत्कर्ष आणि जनावरांच्या माध्यमातून मिळणाऱ्या नैसर्गिक खतामुळे शेतजमिनीचा कस वाढल्याने होणारा शेतकऱ्यांचा लाभ हे परस्परहितकारी असे चक्र आहे. वर उल्लेख केलेली शेती आणि पशुपालक यांच्या परस्पर संबंधांची उदाहरणे आपल्याला हे सांगायला पुरेशी आहेत. आपल्याला निसर्गाकडे परत जायचे असेल आणि नैसर्गिक शाश्वत शेतीच्या परिकल्पनेला प्रत्यक्षात आणायचे असेल तर शेतकरी आणि पशुपालक यांचा परस्पर संबधांची भूमिका खूप महत्त्वाची असणार आहे. म्हणूनच यांचे नाते अधिकाधिक दृढ करणे ही काळाजी गरज आहे. यासाठी व्यवस्था आणि धोरणांची आखणी झाली पाहिजे, जेणेकरून अनिश्चितता आणि गरिबी यांच्या फेऱ्यात अडकलेल्या भटक्या पशुपालक समाजाला अधिकाधिक बळ मिळून त्यांच्या माध्यमातून सर्वांचेच कल्याण होईल.

**Rituja Mitra**
Research Associate at Sahjeevan
Email : rituja@sahjeevan.org

**Sahit Goverdhanam**
Consultant at Economics Centre of
World Resource Institute, India
Email : g.sahith17_mad@apu.edu.in

मराठी अनुवाद : श्री. दत्ता पाटील

*Source : Traversing through the traditional agro-pastoral systems in India, Leisa India - December, 2021*

**LEISA INDIA Language Editions**



Kannada, Telugu, Tamil, Oriya, Hindi, Marathi and Punjabi